| MHST090001252003 | नियमित दिवाणी मुकदमा क्र.४७/२००३<br>रामराव श्रीरंग मोरे<br>विरुद्ध<br>संपत यशवंत मोरे व इतर |
|---|---|

## निशाणी ३१३ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज हा मयत प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या म्हणण्यानुसार, सदर कामातील प्रतिवादी क्र. ९ ही दिनांक २८.०५.२०१४ रोजी मयत झाली असून प्रतिवादी क्र. ९ ही भरतगांव येथे राहत होती व तेथेच मयत झालेने वादीस याबाबतची माहिती मिळाली नाही. या दाव्याच्या सुनावणीवेळी प्रतिवादी क्र. ९ हिचा मृत्युचा दाखला प्रतिवादींकडून हजर झालेवर सदरची माहिती वादी यांना मिळाली. त्यामुळे प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर घेऊ शकले नाहीत. प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास सुमारे ९ वर्षांचा विलंब झाला आहे. तरी न्यायाचे दृष्टीने मयत प्रतिवादी क्र.२ हिचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी प्रस्तुत अर्जास नि.क्र. ३२६ वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नाकारला. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. ९ ही मयत झालेचे वादीला ज्ञान होते. तसेच वादीला प्रतिवादी क्र. ९ चे वारस रेकॉर्डवर घेण्याचे ज्ञान

असतानाही वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता ९ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा उशीर झालेला आहे. सदरचा विलंब हा वादीच्या बेजबाबदारपणामुळे झालेला आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेची विनंती केली आहे.

४. वादी यांनी प्रतिवादी क्र.९ ही मयत असलेबाबतचा मृत्यूचा दाखला दाखल केलेला नाही. सदरची बाब ही विवादीत नसल्यामुळे तसेच प्रतिवादीने दाखल केलेल्या म्हणण्यावरुन प्रतिवादी क्र. ९ ही दि. २८/०५/२०१४ ला मयत झाल्याचे दिसून येत आहे. वादी यानी प्रस्तुतचा दावा स्थावर मिळकतीच्या वाटपासाठी दाखल केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तुत प्रकरणातील वादप्रश्न गुणावगुणावर निकाली काढणेसाठी वादीच्या दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता, प्रतिवादी क्र.९ चे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणे न्यायोचित दिसून येत आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज रुपये १०००/– च्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. सदरचा खर्च वादीने प्रतिवादीस दयायचा आहे.

(खुल्या न्यायालयात घोषित)

UMA KAKASAHEB GANGANE

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2023.09.18 11:00:43 +0530

दिनांक – १६.०९.२०२३

ठिकाण – कोरेगांव

दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कोरेगाव